लक्षणांपूर्वीच आजाराचे निदान!

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : धावपळीच्या जीवनशैलीत प्रत्येक जण ताण-तणावाला सामोरे जात असतो. या तणावाखाली वावरताना (उदा. व्यायाम किंवा झोपेच्या कमतरतेमुळे) शरीराचे विविध भाग एकमेकांशी कसे संवाद साधतात, याचा नकाशाच तयार करण्यात आला आहे. यामुळे भविष्यात लक्षणे दिसण्यापूर्वीच आजार ओळखण्यास मदत होऊ शकते, हे एका नवीन अभ्यासात समोर आल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे.

ठेवींवर आकर्षक व्याजदर
सर्वसाधारण/संस्था ठेवीदार 7.10%* | ज्येष्ठ नागरिक 7.30%*
मुदत:१३ महिन्यांच्यापुढे ते २४ महिन्यांपर्यंत
*अधी साधा. (ROI p.a.)
कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
जीवन का समृद्ध!
Toll Free No.: 1800 233 0234

इंग्लंडमधील युनिव्हर्सिटी ऑफ पोर्ट्समाउथ आणि युनिव्हर्सिटी कॉलेज लंडनच्या संशोधकांनी शरीरातील अवयव ताणाखाली एकमेकांशी कसे संवाद साधतात, याचे तपशीलवार नकाशे तयार केले आहेत. त्यांनी 'ट्रान्स्फर एन्ट्रॉपी' नावाच्या विशेष पद्धतीचा वापर करून २२ निरोगी स्वयंसेवकांचे निरीक्षण केले. यामध्ये व्यायाम (सायकल चालवणे), कमी ऑक्सिजनचे वातावरण आणि झोपेची कमतरता अशा तीन वेगवेगळ्या तणावाच्या परिस्थिती निवडल्या गेल्या. यासाठी सहभागींच्या हृदयगती, श्वसनगती, रक्तातील ऑक्सिजन पातळी आणि श्वासातून बाहेर पडणाऱ्या वायूंचे प्रमाण सतत मोजण्यात आले. यावेळी अवयवांनी साधलेल्या समन्वयाचा परस्परसंबंध लक्षात घेतल्यास आजाराचे निदान लवकर कळते, असे आढळून आले.

हिंगोलीतून बेपत्ता झालेली मुलगी सापडली

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : आई-वडिलांशी वाद झाल्याने हिंगोलीतील १६ वर्षीय मुलीने घर सोडले आणि ती पुण्यात पोहोचली. एकटी फिरत असताना ती बुधवार पेठ परिसरात आली. एका पोलीस मित्राने प्रसंगावधान दाखवून ही माहिती पोलिसांना कळविली. पोलिसांनीही तत्परता दाखवून मुलीला हिंगोली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावर फरासखाना पोलिसांचे पथक मंगळवारी (८ जुलै) गस्त घालत होते. बुधवार पेठेतील श्री दत्त मंदिरासमोर एक मुलगी विमनस्क अवस्थेत फिरत होती. एका पोलीस मित्राने मुलीला पाहिले. मुलगी भेदरलेली होती. पोलीस मित्राने याबाबतची माहिती फरासखाना पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत भस्मे यांना दिली. त्यानंतर पोलिसांनी तेथे धाव घेतली. मुलीची विचारपूस केली. मुलगी हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील वारंगा फाटा गावातील असल्याची माहिती मिळाली. आई-वडिलांशी किरकोळ वाद झाला होता. राग आल्याने ती पुण्यात निघून आल्याची तिने चौकशीत पोलिसांना सांगितले.

दरम्यान, मुलगी बेपत्ता झाल्यानंतर तिच्या आई-वडिलांनी हिंगोली पोलिसांकडे तक्रार दिली होती. पालकांच्या तक्रारीनुसार पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. पोलीस निरीक्षक भस्मे यांनी हिंगोली पोलिसांशी संपर्क साधला. मुलगी पुण्यात सापडली असून, ती सुखरुप असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यानंतर हिंगोली पोलिसांचे पथक पुण्यात पोहोचले. बुधवारी तिला हिंगोली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त ऋषीकेश रावले, सहायक आयुक्त अनुजा देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रशांत भस्मे, गुन्हे शाखेचे निरीक्षक अजित जाधव आदींनी ही कामगिरी केली.

कामगारांच्या 'भारत बंद'मुळे वीज, टपाल, बँक सेवांना फटका

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सार्वजनिक कंपन्या आणि उपक्रमांचे खासगीकरण, चार नव्या कामगार संहिता आणि केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणाचा निषेध करण्यासाठी देशातील प्रमुख कामगार संघटनांनी बुधवारी (९ जुलै) एका दिवसाच्या 'भारत बंद'ची हाक दिली होती. संपात पुण्यातील कामगार संघटांनी सहभाग घेतल्याने सरकारी बँका, टपाल सेवा आणि वीज पुरवठ्यावर परिणाम झाला. नागरिकांना अडथळ्यांना सामोरे जावे लागले.

पुणे शहर आणि जिल्ह्यात सार्वजनिक बँकांतील सुमारे साडेसहा हजार कर्मचाऱ्यांनी संपात सहभाग घेतला. त्यामुळे बँकांच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम झाला. दिवसभरात सुमारे ३० ते ४० हजार धनादेश वटविण्याची प्रक्रिया होऊ शकली नाही. कर्मचारी संघटनांच्या वतीने बँकांसमोर निदर्शने करण्यात आली. आकुर्डीतील खंडोबाचा माळ ते निगडीतील भक्ती शक्तीपर्यंत कर्मचाऱ्यांना मोर्चा काढला. बँक कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन देण्यात आल्याची माहिती पुणे डिस्ट्रिक्ट बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष शिरीष राणे यांनी दिली.

संपात सहभागी होऊन 'महावितरण'च्या पुणे विभागातील १ हजार ७२९ वीज कामगारांनी 'महावितरण,' 'महापारेषण,' आणि 'महानिर्मिती' या सरकारी वीज कंपन्यांच्या खासगीकरणाला विरोध केला. राज्यातील वीज कर्मचाऱ्यांच्या सहा संघटनांच्या 'संयुक्त कृती समिती'च्या नेतृत्वाखाली हा संप करण्यात आला. त्यात महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन, सबॉर्डिनेट इंजिनीअर्स असोसिएशन, राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य वीज कामगार काँग्रेस, तांत्रिक कामगार युनियन, महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियन या संघटनांचा समावेश होता. महावितरणच्या पुणे विभागात ३९२१ कर्मचारी काम करतात. त्यातील २०३७ कर्मचारी संपकाळात कामावर हजर होते, तर १५५ कर्मचाऱ्यांनी रजा घेतली होती. मात्र, १७२९ वीज कर्मचारी संपात सहभाग झाल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली.

'संपामुळे पुणे विभागातील वीज यंत्रणा काही ठिकाणी विस्कळीत झाली, तर 'एनडीए' परिसरात 'महापारेषण'ची यंत्रणा बंद पडल्याने वीज पुरवठा खंडित झाला होता.

केंद्र सरकारच्या खासगीकरणाच्या धोरणाविरोधात कामगार संघटनांनी पुकारलेल्या 'भारत बंद'मध्ये रेल्वे कर्मचारी सहभागी झाले होते.

वाहतूक नियमन करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू

पुणे : कात्रज चौकातील भाजी मंडई परिसरात वाहतूक नियमन करणाऱ्या वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचारी धनंजय वणवे यांचा अकस्मात मृत्यू झाल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली. त्यांच्या मृत्यूमागचे कारण समजू शकले नाही.

धनंजय भरत वणवे (वय ४२) हे भारती विद्यापीठ वाहतूक शाखेत नियुक्तीस होते. बुधवारी (९ जुलै) सायंकाळी ते कात्रज परिसरात वाहतूक नियंत्रण करत होते. त्या वेळी वणवे अचानक बेशुद्ध पडले. त्यांच्याबरोबर असलेल्या सहकाऱ्यांनी तातडीने त्यांना जवळच्या खासगी रुग्णालयात नेले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यांच्या मृत्यूमागचे स्पष्ट झाले नाही. हृदयविकाराच्या तीव्र झटक्यामुळे त्यांचा मृत्यू झाला असावा, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

हिंजवडी परिसरात अंधाराचे चार दिवस

चार दिवसांत फक्त चारच तास वीज

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : वीजपुरवठा खंडित झाल्याने हिंजवडी-मारूंजी-जांभे परिसरातील नागरी जीवन रविवारपासून विस्कळीत झाले होते. मागील चार दिवसांत केवळ चार तास वीजपुरवठा करण्यात आल्याने रोजची कामे करणेही अवघड झाले होते, अशी तक्रार रहिवाशांनी केली. कित्येक तास वीज नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी 'एक्स' या समाजमाध्यमावरून सांगितले. पर्यायी मार्गाने नागरिकांना वीजपुरवठा करण्यात आला होता, तसेच बुधवारी बिघाड दुरूस्त झाल्यानंतर परिसरातील वीजपुरवठा सुरळीत झाल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली.

मारूंजी परिसरातील रहिवासी श्रीकांत शेळके सांगतात, 'रविवारी (६ जुलै) सकाळी वीज यंत्रणेत बिघाड झाल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता. मात्र, बुधवारची (९ जुलै) दुपार उलटूनही वीज सुरू झाली नाही. चार दिवसांत केवळ मंगळवारी सायंकाळी चार ते आठ या कालावधीत वीज सुरू होती. त्यामुळे रोजची कामे करताना अनेक अडथळे निर्माण झाले होते. मुलांना सकाळी शाळेत सोडण्यापासून, घरातील इतर कामे करणे अवघड झाले होते.'

'विजेसारखी मुलभूत सुविधा नसल्याने कोणतेही काम करणे अवघड होते. सोसायटीमध्ये पाण्याची समस्या निर्माण झाली होती. गरजेच्या सुविधा पुरविण्यासाठी जनरेटर वापरावा लागला, त्यासाठी सुमारे ६०० लीटर डिझेल खर्च झाले. मात्र, प्रत्येक वेळी अशा प्रकारे वीज पुरवणे शक्य नव्हते. त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. पहाटे आणि रात्री अंधारामुळे घराबाहेर पडणेही शक्य नव्हते. वेळेवर देयके आणि सर्व प्रकारचे कर भरूनही अंधारात दिवस काढावे लागतात,' अशी खंत कोलते पाटील टाउनशिपमधील रहिवासी विनोद बोऱ्हाडे यांनी व्यक्त केली.

मारूंजी परिसरात आठ वर्षांपासून राहणारे संजय गायकवाड सांगतात, 'आतापर्यंत वीज नसल्याने एवढा मोठा काळ त्रास सहन करावा लागला नव्हता. मात्र, रविवारी वीज गेली, ती बुधवारी सायंकाळपर्यंत आली नाही. घरात, परिसरात वीज नसल्याने काम करणे, पिण्याचे पाणी मिळवणेही कठीण झाले होते. त्यात मुलांच्या परिक्षा तोंडावर आल्यात, अंधारात त्यांनाही अभ्यास करता आला नाही. नेटवर्क नसल्याने महत्वाच्या कामांचा खोळंबा झाला होता.'

दरम्यान, वीज यंत्रणेत यापुढे असे बिघाड होऊ नये म्हणून विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याचे महापारेषणच्या वतीने सांगण्यात आले.

आयटी पार्कचा वीजपुरवठा सुरळीत

महावितरणची माहिती; वीज वाहिनीतील बिघाड दुरुस्त

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : वीज यंत्रणेत बिघाड झाल्याने हिंजवडी परिसरातील 'आयटी' कंपन्यांसह ५२ हजार घरगुती ग्राहकांचा रविवारपासून (६ जुलै) विस्कळीत झालेला वीजपुरवठा 'महापारेषण'ला बुधवारी (९ जुलै) दुपारी साडेबाराच्या सुमारास सुरळीत करण्यात यश आले. सर्व ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्वपदावर आल्याची माहिती 'महावितरण'कडून देण्यात आली.

हिंजवडी आणि पेगासस उपकेंद्रातील वीजपुरवठा देखभाल-दुरुस्तीच्या कामासाठी 'महापारेषण'कडून रविवारी सकाळी ११ वाजता बंद करण्यात आला होता. मात्र, देखभाल-दुरुस्तीनंतर दुपारी सव्वादोन वाजता 'इन्फोसिस ते पेगासस' अतिउच्चदाब वीजवाहिनीत बिघाड झाल्याने उपकेंद्रातील वीजपुरवठा सुरू झाला नाही. उपकेंद्रातील २५ उच्चदाब वाहिन्यांतील वीजपुरवठा बंद झाला. त्यामुळे सुमारे ५२ हजार घरगुती ग्राहक, 'इन्फोसिस', 'नेक्स्ट्रा' या मोठ्या आयटी कंपन्यांसह ९१ उच्चदाब ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला होता.

'महापारेषण'च्या वीज वाहिनीतील बिघाड दुरुस्त करण्यासाठी मोठा कालावधी लागणार असल्याने 'महावितरण'कडून पर्यायी मार्गाने वीजपुरवठा सुरू करण्यात आला. सोमवारी सायंकाळी चारपर्यंत ३५ उच्चदाब ग्राहक आणि अतिउच्चदाब ग्राहक वगळता सर्व ग्राहकांचा वीजपुरवठा पर्यायी मार्गाने सुरू करण्यात आला. मंगळवारी उर्वरित २६ उच्चदाब ग्राहकांचा वीजपुरवठा सुरू करण्यात आला, तर दहा मोठ्या आयटी उद्योगांना चक्राकार पद्धतीने दिवसातून प्रत्येकी पाच तास वीजपुरवठा करण्यात आला. बिघाड दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर बुधवारी (९ जुलै) दुपारी साडेबारा वाजता सर्वच वीज ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्वपदावर आला,' अशी माहिती महावितरणकडून देण्यात आली.

'महापारेषण'चे संचालन विभागाचे संचालक सतीश चव्हाण, पुणे विभागाचे मुख्य अभियंता अनिल कोलप, अधीक्षक अभियंता विठ्ठल भुजबळ, 'महावितरण'च्या पुणे विभागाचे मुख्य अभियंता सुनील काकडे, अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड आणि युवराज जरग यांच्यासह कर्मचाऱ्यांनी वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले.

'महापारेषण'चा बिघाड मोठ्या स्वरूपाचा होता. बाधित उपकेंद्रातील विजेची मागणी पाहता इतर उपकेंद्रांतून पर्यायी मार्गाने वीजपुरवठा करण्याचे आव्हान होते. मात्र, कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमामुळे वीजपुरवठा सुरळीत करण्यात यश आले.- **सुनील काकडे,** मुख्य अभियंता, महावितरण

दुरस्ती पूर्ण करून 'हिंजवडी ते पेगासस' वीजवाहिनी बुधवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास सुरू करण्यात आली. आता 'आयटी' उद्योगांसह घरगुती वीज ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. बिघाडाचे नेमके कारण स्पष्ट झाले नाही. मात्र, वीजवाहिनीतील केबलचा जोड तुटल्याचे निदर्शनास आले.
- विठ्ठल भुजबळ, अधिक्षक अभियंता, महापारेषण

'अजित पवार आठवड्याला बैठक का घेत नाहीत?'

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'सत्तर ते नव्वद हजार कोटींच्या रस्त्यांसाठी खटाटोप करणारे हिंजवडीबाबत अनास्था का दाखवित आहेत? महाविकास आघाडी सरकारच्या काळात पालकमंत्री म्हणून दर आठवड्याला बैठक घेणारे उपमुख्यमंत्री अजित पवार हे आता बैठका का घेत नाहीत? असा सवाल करून खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर टीका केली.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वारजे येथील कामाची पाहणी सुप्रिया सुळे यांनी बुधवारी केली. त्यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. हिंजवडी येथील राजीव गांधी आयटी पार्क परिसरातील नागरी समस्या कायम असून, त्या संदर्भातील मुद्दा सातत्याने उपस्थित होत आहे. आयटी पार्क पिंपरी-चिंचवड महापालिकेत समाविष्ट करावा, अशी मागणीही जोर धरू लागली आहे. रस्त्यांची दूरवस्था, पावसामुळे निर्माण होणारा वॉटर पार्क, वीज लपंडावामुळे हिंजवडी आयटी पार्कबाबत सातत्याने नाराजी व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर खासदार सुळे म्हणाल्या, 'हिंजवडी येथील विविध नागरी समस्यांसंदर्भात चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वेळ मागितली आहे. आयटी पार्कमध्ये लाखो लोक येतात. हिंजवडीचा विषय हा राजकीय नाही. मात्र, सत्तर ते नव्वद हजार कोटींच्या रस्त्यांसाठी सरकार एवढा खटाटोप करत आहेत. मात्र, हिंजवडीबाबत अनास्था का दाखविली जात आहे?'

आमदारच मारामाऱ्या करत असतील, तर कसे होणार ?

आमदार निवासातील उपाहारगृहामध्ये शिळे अन्न दिल्यामुळे शिवसेना (शिंदे) पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी उपाहारगृहातील कर्मचाऱ्याला मारहाण केल्याची घटना घडली आहे. यासंदर्भातही खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, 'पैसा आणि सत्तेची ही मस्ती आहे. देश कोणाच्याही मर्जीने चालत नाही आणि चालणारही नाही. आमदारच मारामाऱ्या करत असतील, तर कसे होणार ?'

'ई-ऑफिस'च्या माध्यमातून होणाऱ्या गैरप्रकारांना चाप

पुणे : बदली किंवा रजेच्या कालावधीत 'ई-ऑफिस'च्या माध्यमातून 'सक्रिय' राहून गैरप्रकार करणाऱ्या महसूल विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कृत्याला चाप लागणार आहे. बदली किंवा रजेवर असताना त्यांचे 'लॉगिन आयडी' बंद करण्यात येणार असून, या कालावधीत त्या पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यासाठी स्वतंत्र 'लॉगिन आयडी' दिला जाणार आहे. त्यासाठी यंत्रणेत आवश्यक ते बदल करण्याचा निर्णय भूमी अभिलेख विभागाने घेतला आहे.

महसूल विभागातील अधिकारी किंवा कर्मचारी रजेवर असेल, तर त्याचा कार्यभार प्रभारी अधिकाऱ्यांकडे सोपविला जातो. मात्र, रजेवर असताना तसेच, बदली झाल्यावरही तातडीने काही अधिकारी आणि कर्मचारी 'ई-ऑफिस'च्या माध्यमातून रजा कालावधीत सक्रिय राहून काही कामांना मंजुरीही देत होते. त्यातून अनेक गैरप्रकार झाल्याची बाब उघडकीस आली.

IndiaShelter Home Loans
इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लि.
अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

कॉर्पोरेट कार्यालय : 6वा मजला, प्लॉट क्र. 15, संस्थात्मक क्षेत्र, सेक्टर 44 गुरुग्राम - 122003 हरियाणा.
शाखा कार्यालय : इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, सिद्धिविनायक हाऊस, तिसरा मजला, ऑफिस क्र. 302 हॉटेल ॲम्बेसेडरजवळ, कर्नाटक बँकेच्या वर, सांगली मिरज रोड, सांगली, 416416 महाराष्ट्र.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 (यापुढे "नियम" म्हणून संदर्भित) मधील नियम 8(6) मधील तरतुदींसह वाचण्यात आलेल्या सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (यापुढे "अधिनियम" म्हणून संदर्भित) अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी **लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे खाली नमूद कर्जदार, सह-कर्जदार आणि जामीनदार किंवा त्यांचे कायदेशीर वारस किंवा प्रतिनिधी आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की, इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लि. (यापुढे "सुरक्षित धनको" म्हणून संदर्भित) यांचेकडे तारण / भाग्रस्त असलेल्या खालील अचल मालमत्तेचा, सुरक्षित धनको चे प्राधिकृत अधिकारी, यांचे नोंदणीकृत कार्यालय - **6 वा मजला, प्लॉट क्र. 15, इन्स्टीट्युशनल एरिया, सेक्टर 44 गुरुग्राम- 122003 हरियाणा,** यांनी ताबा घेतला आहे. तसेच, कर्जदार, सह-कर्जदार आणि जामीनदार यांच्याकडून सुरक्षित धनकोस देय असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी **"जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे"** तत्त्वावर खाली नमूद केलेल्या दिनांकास विक्री करण्यात येईल. खाली नमूद केलेल्या ठिकाणी प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे विक्री केली जाईल.

कर्ज खाते क्रमांक / एपी क्रमांक आणि कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदाराचे नाव	कलम 13(2) अंतर्गत मागणी सूचना दिनांक आणि रक्कम	ताबा दिनांक आणि प्रकार :	राखीव किंमत :	मालमत्तेच्या तपासणीची दिनांक आणि वेळ :
1. श्री./सौ. आशाबाई ज्ञानेश्वर सुतार, 2. श्री./सौ. ज्ञानेश्वर पंडित सुतार कर्ज खाते क्रमांक / एपी क्रमांक : HL41RNLONS000 005064920 आणि HL41CHLONS00 0005104264) / AP-1015 5020, AP-10247525	12-11-2024 आणि रु. 2419546/- (रुपये चोवीस लाख एकोणीस हजार पाचशे शेहेचाळीस फक्त)	23-06-2025 प्रत्यक्ष	रु. 2700000/- (रुपये सत्तावीस लाख फक्त)	11-08-2025
	बोली वृद्धी रक्कम रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)		बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) : रु. 270000/-(रुपये दोन लाख सत्तर हजार फक्त)	ईएमडी जमा करण्याची अंतिम दिनांक : 12-08-2025 लिलावाची दिनांक : 13-08-2025

स्थावर मालमत्ता / सुरक्षित मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, आर.एस. क्र. 1448/2/बी/80, मिळकत क्र. 2750, क्षेत्रफळ मोजमाप 148.59 चौ. मी., सोबत त्यावरील बांधकाम, कवठेमहांकाळ ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली - 416405 येथे स्थित. चतुःसीमा :- पूर्व - रस्ता, पश्चिम - श्री. भोसले यांची मालमत्ता, उत्तर - प्लॉट क्र. 08, दक्षिण - श्री. मुरलीधर कुलकर्णी यांची मालमत्ता.

ईएमडी जमा करण्याचे ठिकाण / लिलावाचे ठिकाण : इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, सिद्धिविनायक हाऊस, तिसरा मजला, ऑफिस क्र. 302 हॉटेल ॲम्बेसेडरजवळ, कर्नाटक बँकेच्या वर, सांगली मिरज रोड, सांगली, 416416 महाराष्ट्र.

देयकाची पद्धत : सर्व पेमेंट इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेडच्या नावे डिमांड ड्राफ्ट द्वारे केले जातील.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, **कृपया सुरक्षित धनको यांची वेबसाइट www.indiashelter.in पहा किंवा प्राधिकृत अधिकारी यांच्याशी संपर्क साधा.**

IndusInd Bank
इंडसइंड बँक लिमिटेड
CIN: L65191PN1994PLC076333
नोंदणीकृत कार्यालय: २४०१, जनरल थीम्याय्या रोड, (कँटोनमेंट), पुणे – ४११ ००१.
सेक्रेटरिअल आणि इन्व्हेस्टर सर्व्हिसेस सेल: ७०१, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, १६७, गुरू हरगोविंदजी मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३; **दूरध्वनी:** (०२२) ६६४१ २४८७/६६४१ २३५९
ई-मेल: investor@indusind.com; **वेबसाइट:** www.indusind.com

इंडसइंड बँक लिमिटेडच्या प्रत्यक्ष समभागांच्या हस्तांतर विनंत्यांना पुन्हा दाखल करण्यासाठी एक विशेष खिडकी उपलब्ध

सेबीच्या २ जुलै २०२५ च्या परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/एमआयआरएसडी/एमआयआरएसडी-पीओडी/पी/सीआयआर/२०२५/९७ ला अनुसरून, बँकेच्या सर्व भागधारकांना याद्वारे कळविण्यात येते की, १ एप्रिल २०१९ च्या अंतिम मुदतीपूर्वी दाखल केलेल्या हस्तांतर विलेख आणि कागदपत्रांमध्ये/प्रक्रियेत/किंवा अन्यथा त्रुटींमुळे नाकारलेल्या/परत केलेल्या किंवा अन्य काही कारणांमुळे लक्ष न दिलेल्या प्रत्यक्ष समभागांच्या हस्तांतर विनंत्यांना पुन्हा दाखल करण्यासाठी, ७ जुलै २०२५ ते ६ जानेवारी २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी एक विशेष खिडकी उघडण्यात आली आहे.

ज्या गुंतवणूकदारांनी ३१ मार्च २०२१ (हस्तांतर विलेख पुन्हा दाखल करण्याची कट-ऑफ तारीख) ची पूर्वीची अंतिम मुदत चुकवली आहे, त्यांनी बँकेचे निबंधक व भाग हस्तांतर एजंट मेसर्स एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड), सी-१०१, २४७ पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई – ४०० ०८३, **दूरध्वनी:** +९१ ८१० ८११ ६७६७ / १८०० १०२० ८७८, **ई-मेल:** rnt.helpdesk@in.mpms.mufg.com कडे आवश्यक कागदपत्रे सादर करून ही संधी घेऊ शकतात.

इंडसइंड बँक लिमिटेडसाठी
सही / -
आनंद कुमार दास
कंपनी सचिव
सदस्यता क्रमांक FCS-६९५०

ठिकाण: मुंबई
दिनांक: ९ जुलै २०२५

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात तपशीलवार वर्णन केलेल्या जागा मिळकतीं वद्दल, त्यांच्या विद्यमान मालकांनी श्री किशोर गेणुजी पारठे यांचे बरोबर वेगवेगळ्या विसार पावती करून सदर जागा त्यांच्या लाभात विकण्याचे ठरविले होते आता, सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांनी सदर श्री. किशोर गेणुजी पारठे यांच्यासह सदर मिळकती आमचे अशीलास कायम खुश खरेदीने विक्री करण्याचे ठरविलेले असून सदरच्या मिळकती या निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे असा भरवसा आमचे अशीलांना दिलेला आहे.

तरी खालील परीशिष्ठा मध्ये तपशीलवार वर्णन केलेली मिळकतींच्या संदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा, वहिवाट, दावा, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, लिज, भाडेपट्टा, लिन, बक्षीस, असाईनमेंट, कुळ हक्क, पोटगी, कोर्ट जप्ती, भागीदारी, विकसन हक्क, व्यवस्था पत्र किंवा कोणत्याही प्रकारचा करार मदार असल्यास त्यांनी त्या बाबत योग्य त्या पुराव्यासह आमचे खाली लिहीलेल्या पत्त्यावर सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कळवावे व तशी पोच घ्यावी.

सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास **सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही कसलाही हक्क व अधिकार नाही असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आम्ही आमचे अशिलांना प्रस्तुत मिळकती निर्वेध व निजोखमी असल्याचा दाखला देऊ** तसेच तदनंतर आमचे अशील विद्यमान मालकांबरोबर सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कसलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

परिशिष्ठ

मिळकतीचे वर्णन :

अ. तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका वेल्हा, मे सब रजिस्ट्रार सो वेल्हा तसेच गामपंचायत वालवड, तालुका पंचायत समिती वेल्हा व जिल्हा परीषद पुणे यांचे हददीतील गाव मौजे बालवड येथील गट नं. **१४५,** यासी एकुण क्षेत्र **४१** हेक्टर **६३** आर आधिक पोट खराबा **०९** हेक्टर **२०** आर असे एकूण **५०** हेक्टर **८३** आर या पैकी :

१. श्री. आदित्य विठ्ठल महाडिक यांचे स्वकष्टार्जीत खरेदी मालकीचे क्षेत्र ०० हेक्टर **७१.२५** आर आधिक पोट खरावा ०० हेक्टर **८.७५** आर असे एकुण ०० हेक्टर ८० आर,

२. सौ. मोहीनी राजीव दानी यांचे स्वकष्टार्जीत खरेदी मालकीचे क्षेत्र ०० हेक्टर **३२.७६** आर आधिक पोट खरावा ०० हेक्टर **७.२४** आर असे एकुण ०० हेक्टर **४०** आर,

३. श्री. मयुरेश सोहनी यांचे स्वकष्टार्जीत खरेदी मालकीचे क्षेत्र ०० हेक्टर **३२.७६** आर आधिक पोट खरावा ०० हेक्टर **७.२४** आर असे एकुण ०० हेक्टर **४०** आर,

अशी एकत्रीत पणे ०१ हे. ६० आर ही मिळकत

यासी चतुःसीमा पुढील प्रमाणे :

पुर्वेस : **२०** फुटी रस्ता व त्यानंतर श्री देवकर यांची जागा मिळकत

दक्षिणेस : सौ. अपर्णा चिंतामण दिक्षीत यांची जागा मिळकत

पश्चिमेस : गट नं. **१४५** मधील उर्वरीत मिळकत व नेवसे यांची जागा मिळकत

उत्तरेस : श्री अंबादास देवकर व सौ मीना शरद सुर्यवंशी व श्री किशोर गेणुजी पारठे यांची जागा मिळकत

ब. तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका वेल्हा, मे सब रजिस्ट्रार सो वेल्हा तसेच ग्रामपंचायत बालवड, तालुका पंचायत समिती वेल्हा व जिल्हा परीषद पुणे यांचे हददीतील गाव मौजे वालवड येथील गट नं. **१४५,** यासी एकुण क्षेत्र **४१** हेक्टर **६३** आर आधिक पोट खराबा **०९** हेक्टर **२०** आर असे एकुण **५०** हेक्टर **८३** आर या पैकी सौ. मीना शरद सुर्यवंशी यांचे मालकीची जागा मिळकत यासी क्षेत्र ०० हेक्टर **२२** आर, यासी चतुःसीमा पुढील प्रमाणे :

पुर्वेस : **२०** फुटी रस्ता

दक्षिणेस : श्री अदित्य महाडीक यांची जागा मिळकत

पश्चिमेस : गट नं **१४५** मधील श्री वाळासाहेब अनंता ठाकर व श्री मयुरेश सोहनी यांची जागा मिळकत

उत्तरेस : श्री किशोर गेणुजी पारठे यांची जागा मिळकत

येणेप्रमाणे चतुःसीमापूर्वक जागा मिळकत मिळकत त्यातील जाण्या येण्याचे, वहिवाटीचे व मालक म्हणुन असणारे इतर सर्व हक्कांसहित कोणत्याही प्रकाराचा हक्क व अधिकार राखून न ठेवता दरोबस्त ही मिळकत सदर नोटीशीचा विषय वस्तु आहे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे

दिनांक : १०/०७/२०२५

खरेदीदारा तर्फे
ॲड. किशोर कृष्णा मुर्केवार

KALYANI
कल्याणी स्टिल्स लिमिटेड
सीआयएन : एल27104एमएच१९७३पीएलसी०१६३५०
नोंदणीकृत कार्यालय :